**विषय:- कार्यालयीन कामाकरिता भाडेतत्वावर वाहने उपलब्ध करुन घेणे करीता अर्थसंकल्पीय तरतुदीचे पुनर्विनियोन करणेकामी वाहन विभागातील इतर लेखाशिर्षातुन निधी वर्ग करणे.**

**मे. सादर,**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एम.सी.ओ. २०२०/७१(भाग-२)/ नवि-१४, दिनांक.०६/०६/२०२२ अन्वये महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ अ (१ अ) तरतुदीनुसार महानगरपालिकेच्या या अधिनियमाखालील सर्व अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि तिची सर्व कामे व कर्तव्ये पार पाडण्यासाठी या पोट-कलमान्वये मा. प्रशासक तथा आयुक्त सो यांचे अधिकार आहे. भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात विविध ठिकाणी विकास कामे करण्यासाठी आर्थिक तरतुद करणे हे मा. प्रशासक तथा आयुक्त सो. यांचे अधिकार आहे. त्याप्रमाणे या अधिनियमाच्या कलम ९५ व ९६ प्रमाणे दर वर्षी उत्पन्न व खर्च यांचे अंदाज तयार केले जातात. त्याप्रमाणे सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात उत्पन्न व खर्च करण्यासाठी लेखाशिर्ष निहाय तसेच बाब निहाय आर्थिक तरतुद करण्यात आली होती. या तरतुदी मधुन आतापर्यंत खर्च करण्यात आलेला आहे. त्याचा तपशिल खालील नमुद केल्याप्रमाणे आहे.

| अ. क्र. | लेखाशिर्ष | सन २०२४-२५ करीता करण्यात आलेली तरतुद | सन २०२४-२५ मध्ये झालेला प्रत्यक्ष खर्च | दि.२१/०६/२४ पर्यतची शिल्लक | मार्च २५ पर्यंत येणारा अंदाजे अपेक्षित खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | वाहनांची दुरुस्ती व निगा, साधने, टायर्स, वाहनांचे सुटे भाग खरेदी | रु.१००.०० लक्ष | रु.१०.७२ लक्ष | रु.८९.२७ लक्ष | रु. ५४.२७लक्ष |
| २ | कार्यालयीन कामा करीता भाडेतत्वावर वाहने घेणे. | रु.१०७.७८ लक्ष | रु.१०४.६८ लक्ष | रु.३.७९ लक्ष | रु.१५३.७९ लक्ष |
| ३ | मालमत्ता व वाहनांचा विमा | रु.५०.०० लक्ष | रु.४.५५ लक्ष | रु.४५.४५ लक्ष | रु.४५.४५ लक्ष |
| ४ | वाहन भत्ता | रु.३०.०० लक्ष | रु.० लक्ष | रु.३०.०० लक्ष | रु.५.०० लक्ष |
| ५ | महानगरपालिकेच्या वाहनांनासाठी पेट्रोल, डिझेल व ऑईल इत्यादी खरेदी | रु.२००.०० लक्ष | रु.२४.४३ लक्ष | रु. १७५.५७ लक्ष | रु. १७५.५७ लक्ष |
| ६ | वाहने खरेदी | रु.१००.०० लक्ष | रु.० लक्ष | रु. १००.००लक्ष | रु. १० लक्ष |

**सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात उत्पन्न व खर्च करण्यासाठी लेखाशिर्ष कार्यालयीन कामाकरिता भाडेतत्वावर वाहने उपलब्ध करुन घेणे करीता १०७.७८ लक्ष तरतुद करण्यात आली होती.**

परंतु महानगरपालिकेच्या बांधकाम विभागास डंपर वाहनाची आवश्यकता असल्याने माहे एप्रिल २०२४ ते ऑगस्ट २०२४ या कालावधीत भाडेतत्वावरील डंपर वाहने पुरविणे करीता कार्यालयीन कामा करीता भाडेतत्वावर वाहने घेणे या लेखाशिर्षा मधील आर्थिक तरतुदीचा वापर करण्यात आला असल्याने कार्यालयीन कामा करीता भाडेतत्वावर वाहने घेणे या लेखाशिर्षा मध्ये रु.३.७९ लक्ष निधी उपलब्ध आहे.

सन २०२४-२०२५ या वित्तीय वर्षात जो अर्थसंकल्प मंजूर झाला त्या अर्थसंकल्पामध्ये कार्यालयीन कामाकरिता भाडेतत्वावर वाहने पुरविणे या लेखाशिर्षा अंतर्गत शासनाकडुन प्रतिनियुक्तीने आलेले अधिकारी वर्ग यांना कार्यालयीन कामाकरिता वाहने पुरविणे, महानगरपालिकेचे अधिकारी व विभाग यांना मागणी नुसार भाडेतत्त्वावरील वाहने पुरविणे, घरपट्टी पाणीपट्टी वसुली मोहिम राबविणे कामी भाडेतत्त्वावरील वाहने पुरविणे, पल्स पोलिओ मोहिमेकामी भाडेतत्वावर जीप वाहने पुरविणे, तसेच शासनाच्या दौरे व इतर कार्यक्रमांकरीता कालावधीमध्ये प्रशासकीय कामकाजाकरीता भाडेतत्त्वावरील वाहने पुरविणे कामी निधीची कमतरता आहे. कार्यालयीन कामाकरिता भाडेतत्वावर वाहने पुरविणे या लेखाशिर्षा अंतर्गत करावयाच्या वाहन विभागातील कामांची यादी व अपेक्षित खर्च पुढील प्रमाणे सादर करीत आहे.

| अ.क्र. | लेखाशिर्ष व कामाचे नाव | रक्कम |
|---|---|---|
| | कार्यालयीन कामाकरीता भाडेतत्त्वावर वाहने पुरविणे. | |
| १) | भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचे अधिकारी व विभाग यांना प्रशासकीय कामकाजाकरीता माहे ऑगस्ट २०२४ ते मार्च २०२४ या ८ महिन्यांच्या कालावधीत प्रति माह १० वातानुकूलीत कार व ९ अवातानुकूलीत जीप वाहने इंधन व वाहनचालकासह पुरविणे. (प्रति माह अंदाजे खर्च रु.१२,५०,०००/-) | रु.१०० लक्ष |

| | | |
|---|---|---|
| २) | भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचे बांधकाम विभाग व आरोग्य विभाग यांना मागणी नुसार तसेच शासनाच्या दौरे व इतर कार्यक्रमांकरीता भाडेतत्त्वावरील वाहने इंधन व वाहनचालकासह पुरविणे. | रु.५० लक्ष |
| | **एकुण** | **रु.१५० लक्ष** |

तरी वाहन विभागातील भाडेतत्वावर वाहने पुरविणे या लेखाशिर्षाअंतर्गत मार्च २०२५ पर्यंत खर्च करणे कामी रु. ३.७९ लक्ष मात्र तरतुद शिल्लक असुन तरतुद अपुरी पडत असल्याने उपरोक्त कामाकरिता वाहन विभागातील वाहनांची दुरुस्ती व निगा, साधने, टार्यर्स, वाहनांचे सुटे भाग खरेदी या लेखाशिर्षात रु.८९.२७ लक्ष शिल्लक असुन सदर निधीमधुन रु.३५ लक्ष इतकी रक्कम भाडेतत्त्वावर वाहने पुरविणे या लेखार्शिषकात वर्ग करणे व वाहने खरेदी या लेखाशिर्षात रु.१०० लक्ष शिल्लक असुन सदर निधीतुन ९० लक्ष भाडेतत्त्वावर वाहने पुरविणे या लेखार्शिषकात वर्ग करणे व वाहन भत्ता लेखाशिर्षात रु.३० लक्ष शिल्लक असुन सदर निधीमधुन रु.२५ लक्ष इतकी रक्कम भाडेतत्त्वावर वाहने पुरविणे या लेखार्शिषकात वर्ग म्हणजेच पुर्नविनियोजन करणे कामीच्या प्रस्तावास मा. आयुक्त सो. यांनी मंजुरी प्रदान केली आहे.

सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षात महानगरपालिकेस कार्यालयीन कामाकरिता मासिक भाडेदरावर वाहने पुरविणे कामीच्या प्रस्तावास मा. महासभेची मान्यता आवश्यक आहे. सद्या शासनाचे दिनांक १० जुन २०२२ च्या आदेशान्वये मा. आयुक्त यांना प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेले असल्याने मा. महासभेचे सर्व अधिकार मा. प्रशासक तथा आयुक्त यांना प्राप्त झालेले आहे. या अधिकार कक्षे नुसार उपरोक्त प्रस्तावास मा. प्रशासक तथा आयुक्त भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका यांच्या धोरणात्मक निर्णयासाठी सदरचा प्रस्ताव सविनय सादर.

**प्रशासकीय ठराव क्रमांक :-** 848 **दिनांक :-** 28/6/2024

वाहन विभागातील भाडेतत्वावर वाहने पुरविणे या लेखाशिर्षाअंतर्गत मार्च २०२५ पर्यंत खर्च करणे कामी रु. ३.७९ लक्ष मात्र तरतुद शिल्लक असुन तरतुद अपुरी पडत असल्याने उपरोक्त कामाकरिता वाहन विभागातील वाहनांची दुरुस्ती व निगा, साधने, टार्यर्स, वाहनांचे सुटे भाग खरेदी या लेखाशिर्षात रु.८९.२७ लक्ष शिल्लक असुन सदर निधीमधुन रु.३५ लक्ष इतकी रक्कम भाडेतत्त्वावर वाहने पुरविणे या लेखार्शिषकात वर्ग करणे व वाहने खरेदी या लेखाशिर्षात रु.१०० लक्ष शिल्लक असुन सदर निधीतुन ९० लक्ष भाडेतत्त्वावर वाहने पुरविणे या लेखार्शिषकात वर्ग करणे व वाहन भत्ता लेखाशिर्षात रु.३० लक्ष शिल्लक असुन सदर निधीमधुन रु.२५ लक्ष इतकी रक्कम भाडेतत्त्वावर वाहने पुरविणे या लेखार्शिषकात वर्ग म्हणजेच पुर्नविनियोजन करणे कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ४५२ (अ) (१) नुसार दिनांक १० जुन २०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी श्री. अजय वैद्य, प्रशासक, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, वरील प्रस्तावनेत नमुद केल्याप्रमाणे कार्यालयीन कामाकरिता भाडेतत्वावर वाहने उपलब्ध करुन घेणे करीता अर्थसंकल्पीय तरतुदीचे पुर्नविनियोजन करणेकामी वाहन विभागातील इतर लेखाशिर्षातुन निधी वर्ग करणेस प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.

**वरील प्रमाणे ठराव मंजुर**

**(श्री. अजय वैद्य)**
**प्रशासक**
**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका**